**संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या वन जमिनीवरील अतिक्रमणांचे निष्कासन व पुनर्वसनासाठी अतिक्रमकांची पात्रता/अपात्रता निश्चितीनंतर संबंधित प्राप्त तक्रारी/अर्जाचे निवारण करुन संबंधित अर्जासंदर्भात पात्रतेबाबत अंतिम निर्णय घेण्यासाठी तक्रार निवारण समिती (Grievance Redressal Committee) ची स्थापना करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक: डब्ल्यूएलपी ०४.२६/प्र.क्र. १३२/फ-१**
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक: २४ एप्रिल, २०२६.

**संदर्भ:**

१. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट याचिका क्र. ३०५/९५ मध्ये मा. न्यायालयाने दिलेले आदेश दिनांक ०७.०५.१९९७.
२. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक ०८.१३/प्र.क्र. ३०१/फ-१, दिनांक ०८.०१.२०१४.
३. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील जनहित याचिका क्र. ४८/२०२३ व रिट याचिका क्रमांक ३०५/९५ मधील अवमान याचिका क्र.९२३७/२०२३ यांच्या एकत्रित सुनावणीमधील मा. न्यायालयाने दिलेले आदेश दिनांक १४.०१.२०२५.
४. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक डब्ल्युएलपी ०४.२०२५/प्र.क्र. १०२/फ-१, दि. ०९.०४.२०२५
५. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक डब्ल्युएलपी ०४.२०२५/प्र.क्र. १०२/फ-१, दिनांक १०.०४.२०२६

**प्रस्तावनाः**

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या वन जमिनीवरील अतिक्रमण निष्कासन व अपात्र अतिक्रमकांचे निष्कासन पुनर्वसन करण्याकरिता मुंबई उपनगर जिल्हयातील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या क्षेत्रासाठी व ठाणे जिल्हयातील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या क्षेत्रासाठी संदर्भ क्र. ५ मधील शासन निर्णयान्वये दोन समित्या गठित करण्यात आल्या आहेत.

संदर्भ क्र. ५ मधील शासन निर्णयान्वये गठित समित्यांच्या निर्णयाच्या अनुषंगाने, व्यक्ती/पक्षकार यांच्याकडून प्राप्त होणारे अर्ज/तक्रारीचे निवारण करुन संबंधीत अतिक्रमणधारकाच्या पात्रतेबाबत अंतिम निर्णय घेण्यासाठी तक्रार निवारण समिती (Grievance Redressal Committee) ची स्थापना करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :**

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या वन जमिनीवरील अतिक्रमणांच्या निष्कासन व पुनर्वसनासाठी अतिक्रमकांची पात्रता/अपात्रता निश्चितीनंतर व्यक्ती/पक्षकार यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारी/अर्जाचे

निवारण विहित मर्यादेत करुन त्यांच्या पात्रतेबाबत अंतिम निर्णय घेण्यासाठी खालील प्रमाणे तक्रार निवारण समितीची (Grievance Redressal Committee) स्थापना करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. अभय ठिपसे, सेवानिवृत्त न्यायाधिश | अध्यक्ष |
| २. | श्री. किरण दाभोळकर, सेवानिवृत्त सहाय्यक वनसंरक्षक | सदस्य |

२. तसेच संदर्भ क्र. ५ अन्वये गठित समितीव्दारा पात्रता निश्चिती झाल्यानंतर संबंधित अतिक्रमणधारक समाधानी नसल्यास उक्त समितीच्या निर्णयाच्या विरुध्द पुढील ३० दिवसांच्या कालमर्यादेत त्यांची रितसर तक्रार सदर तक्रार निवारण समितीकडे दाखल करु शकतात. नमुद केलेल्या कालावधीच्या बाहेर तक्रार/अर्ज दाखल करुन घेतले जाणार नाही.

३. सदरच्या तक्रार निवारण समितीकडे प्राप्त होणाऱ्या अर्ज/तक्रारीच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही संबंधित समितीने तक्रार दाखल झालेल्या दिनांकापासून पुढील ९० दिवसात कार्यवाही करावी. पात्रता निश्चितीच्या अनुषंगाने तक्रार निवारण समितीने घेतलेला निर्णय अंतिम राहील.

४. उक्त प्रयोजनार्थ गठीत करण्यात आलेल्या समितीच्या कामकाजाकरीता समन्वयक म्हणून सहाय्यक वनसंरक्षक (तांत्रिक), वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांची नेमणूक करण्यात येत आहे.

५. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील अतिक्रमकांच्या पुनर्वसन अंतर्गत पात्रता निश्चित करण्यासाठी गठीत करण्यात येत असलेल्या तक्रार निवारण समितीच्या सदस्यांना दरमहा रु. ५०,०००/- एवढे मानधन निश्चित करण्यात येत असून, त्याचे प्रदान संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या प्रशासनामार्फत अदा करण्यात यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक क्रमांक २०२६०४२४१२५७३४४८१९ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने प्रमाणित करण्यात येत आहे

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

UDAY CHANDRAKANT DHAGE

Digitally signed by UDAY CHANDRAKANT DHAGE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT,
2.5.4.20=d50c7e8b1126d276bbe49105f9d24fff67dc9032e4afab15f5d0d94a0ea6cf5a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=097E903F6E5707A0A9A3CDAEBE40C9235E8FDA1EE2C8C4EA7713D6497937DCED, cn=UDAY CHANDRAKANT DHAGE
Date: 2026.04.24 12:59:32 +05'30'

**(उदय ढगे)**
**विशेष कार्य अधिकारी**
**महसूल व वन विभाग.**

**प्रति,**

१. अपर मुख्य सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
४. वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली, मुंबई
५. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर/ठाणे
६. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई
७. अतिरिक्त जिल्हाधिकारी (अतिक्रमण निर्मूलन), मुंबई
८. सर्व संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी.